# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 28/02/2020 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## चोरी

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 2 कि.मी अंतरावर चित्रकला महा सावरगाव रोड वरील येथे दिनांक 26/02/2020 चे 17:00 वा. ते दिनांक 27/02/2020 चे 00:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अल्का मोरेश्वर मेटांगळे, वय 39 वर्ष, रा. सावरगाव या कला संस्कृती चित्रकला महाविद्ययात गेल्या असता तेथे त्यांना दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. फिर्यादींनी आत जावुन पाहणी केली तर पंचिंग मशिन किं. 250/– रु, इंकपॅड किं 150/–रु. पेपर व्हेट कि. 100/– रु लोखंडी बेंच किं. 1,000/– रु असा एकुण 1,500/– रु चे सामान व पेन्टींग वर्क फाईल अज्ञात आरोपीने कॉलेजच्या दरवाजाचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन एकुण 1,500/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण भेंडे 9923193642 हे करीत आहे.

2) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 7 कि.मी अंतरावर मौजा सितापुर पवनी येथे दिनांक 26/02/2020 चे 11.00 वा. ते दिनांक 27/02/2020 पर्यंत फिर्यादी नामे– अरूनकुमार भिकुलालजी गुप्ता, वय 60 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 पवनी यांचे राईस मिलचे बाहेरील शेड मध्ये धान पिसण्या करिता प्रति 40 किलो चे 400 धानाचे कट्टे ठेवले असता त्यामधील 80 धानाने भरलेले कट्टे अंदाजन कि. 28,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अशोक उईके 9373651471 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर